# साप आपले मित्र



## महाराष्ट्रातील प्रमुख साप

श्री. राहुल शिंदे

# मनोगत

साप हे दोन शब्द आपल्याला मृत्यू समान वाटतात,कारण या

सापांबद्दल फारशी माहिती नसल्याने अनेक अंधश्रद्धा पसरल्या आहेत..गेले १२ वर्षे सर्पमित्र म्हणून काम करत असताना वेगवेगळे अनुभव आले,अगदी मृत्यूचा ही असो,आजतागायत १०००० सापांना काळजीपूर्वक पकडून निसर्गाच्या सानिध्यात सोडून जीवदान दिले.या मध्ये सर्पमित्र निसार नदाफ व प्रसाद शिंदे. यांचे मोलाचे योगदान लाभले. साप आपला शत्रू नसून मित्र आहेत,हे पटवून देण्यासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबिले. जसे शाळा,कॉलेज, ग्रामपंचायत इ. ठिकाणी सर्पप्रबोधन केले. आता हा एक प्रयोग...सध्या सोशल मीडियाचा युग आहे.त्याचा उपयोग सर्प प्रबोधनासाठी व्हावा म्हणून हा एक प्रयोग..

या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख सापांविषयी माहिती आहे.याचा मुख्य उद्देश म्हणजे आपणा सर्वांपर्यंत सापांची माहिती पुरवणे.काही अंधश्रद्धा व त्याच्यामागील शास्त्रीय कारणेही दिली आहेत.

हे पुस्तक सर्वसामान्याबरोबरच सर्पमित्रांना देखील महत्त्वाचे आहे. या पुस्तकातील मुबलक छायाचित्रांमूळे याचा field guide म्हणून उपयोग करू शकतो.

महाराष्ट्रातील सर्वच साप जरी समाविष्ट करता आले नसतील तरी प्रामुख्याने आढळणारे सापांची माहिती दिली आहे

***सर्पअभ्यासक श्री. राहुल शिंदे***

# आमचे आदर्श

प्रत्येक माणसाला गुरु असतोच.गुरु शिवाय माणसाला ज्ञान प्राप्ती होत नाही. गुरु हा माणसाच्या अस्तित्वाचा एक भाग आहे.

सर्प संवर्धनाचे काम करत असताना काही अनमोल व्यक्तींची ओळख झाली व कालांतराने ते आमचे आदर्श बनले.या सर्वांकडून खूप काही शिकण्यास मिळाले.

यांचा आम्हाला सहवास लाभला हेच आमचे भाग्य.

यांच्या बद्दल थोडंसं........



**नाव :-** ***<u>कै.सर्पमित्र बाबुराव टक्केकर सर.....</u>***

महाराष्ट्रातील पहिले सर्पमित्र ढोलगरवाडी तालुका. चंदगड, जिल्हा.कोल्हापूर येते **सन 1966 पासून सर्पशाळा व सर्पांबद्दलचे अंधश्रद्धा दूर करण्याचे काम चालू ठेवले आहे**.यांच्या निधनानंतर ही परंपरा त्यांच्या मुलांनी ( ***श्री. प्रकाश टक्केकर व संदीप टक्केकर*** ) व सर्प शाळेतील शिक्षकांनी अव्याहत पणे सुरू ठेवली आहे.दर वर्षी नागपंचमीला ढोलगर वाडी येथे होणाऱ्या कार्यक्रमातून अनेक सर्पप्रेमींना प्रेरणा मिळत आहे.



**सर्पतज्ञ व सर्पमित्र** ***<u>मा.श्री.नितीनजी सोनवणे सर</u>*****......**

गेल्या **40** वर्षापासून सापांना सुरक्षित पणे पकडून निसर्गात सोडण्याचे काम ते करत आहेत.या **40** वर्षात एकदाही सर्पदंश न घेता त्यांचा सविस्तर अभ्यास व सापांवर संशोधन ते करत आहेत.आतापर्यंत **50,00**0 हून जास्त सापांची त्यांनी निसर्गात मुक्तता केली.

काही वर्षांपूर्वी त्यांनी **Discovery channel** साठी सापांची **Documentary** प्रदर्शित केली होती.आणि सर्पतज्ञ म्हणून काम करत असताना त्यांनी बनवलेली **'The Real Hero'** या **Short Film** ची **'International Film Festival'** साठी निवड झाली आहे.

आतापर्यंत

**3000** हून अधिक **प्रबोधनात्मक** कार्यक्रमातून सापांबद्दल जनजागृती त्यांनी केली आहे.


**नाव :-** ***<u>कै.गफुर ईमानसाब मुछाले</u>***.

यांनी **45000** हून अधिक सापांना जीवदान दिले.**2000** हून अधिक **सर्प प्रबोधन व जनजागृतीचे कार्यक्रम** केले.

**सोलापुरातील पहिले सर्प मित्र** म्हणून यांना मान.यांचे साप पकडण्याचे प्रशिक्षण कोल्हापूर येथील ढोलगर वाडी येथे झाले.यांचे **सुपुत्र श्री. अश्पाक मूछाले** यांनी वयाच्या 8व्या वर्षापासून साप पकडण्यास सुरुवात केली.यांनी ही कला त्यांच्या वडिलांकडून प्राप्त केली.

# सापांची उत्क्रांती :-

सापांचे अस्तित्व सुमारे १५ कोटी वर्षाआधी पासून असल्याचे जीवाश्म अभ्यासातून समोर आले आहे.साप जरी सरपटणारा प्राणी असला तरी,काही वर्षापूर्वी पाली प्रमाणे पाय होते व कालांतराने ते नाहीसे झाले.



## साापांबद्दल थोडसं :-

साप आपला शत्रू नसून मित्र आहे, हे प्रत्येकाच्या मनात रुजणे गरजेचे आहे. साप हा अन्नसाखळीतील प्रमुख घटक आहे. विज्ञान सांगते की, सापांचे अस्तित्व १५ कोटी वर्षांपूर्वी म्हणजेच मानवाच्या १० कोटी वर्षे आधी पासून आहे..सापांपासून मानवास अनेक फायदे आहेत.जितके आपण सापाला घाबरतो,त्याहून अधिक साप आपल्याला घाबरत असतो.तो स्वतःहून कधीही दंश करत नाही.जेव्हा आपल्याकडून त्याला काही धोका वाटतो तेव्हाच तो आपल्याला दंश करतो.शहरीकरणामुळे सापांची संख्या झपाट्याने कमी होत चालली आहे.यामुळे बरेचश्या सापांच्या प्रजाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.जर सापांची संख्या कमी झाली,तर अन्नसाखळी विस्कळीत होईल व त्याचे परिणाम पर्यावरणावर घातक होतात.भारतात सुमारे ३०% पिकांची नासाडी उंदीर करतात.

## ***उंदरांपासून होणारी नासाडी :-***

एका सापामुळे सुमारे 5,50,000 उंदरांवर नियंत्रण होते.एका उंदराची जोडी वर्षाला सरासरी 850 पिल्लांना जन्म देते.एक साप एका आठवड़्याला 2 उंदीर म्हणजे एक जोडी (850×52) आठवडे सरासरी = 44,200 उंदीर.. एक साप सरासरी 12 वर्षे जगल्यास 45,000 ×12 = 5,40,000 इतक्या उंदरांवर नियंत्रण ठेवतो..

## **सापांपासुन होणारे फायदे :-**

1. साप उपद्रवी उंदरांवर नियंत्रण ठेवतो.
2. सापांच्या विषाचा उपयोग औषधे बनवण्यासाठी केला जातो. उदा. Cancer, Heart Attack, Blood Pressure, Anesthesia, Pain Killer, Etc.
3. काही साप पाण्यावरील डासांची अंडी खाऊन Dengue, Maleria इ.रोगांपासून आपले संरक्षण करतो.
4. जर विषारी साप चावला तर त्याच प्रकारच्या विषारी सापांचे प्रतिविष तयार करता येते.
5. बरेचसे कीटक व अळ्या पिकांची नासाडी करतात.त्यांना खाण्याचे काम साप करतो व त्या किडे व अळ्यावर नियंत्रण ठेवतो.

## ***सापांची संख्या कमी होण्यामागची कारणे :-***

1. मनुष्य जंगलावर करत असलेला अतिक्रमण आणि जंगलतोड.
2. महामार्गाची आणि वाहनाची संख्या वाढल्याने दरवर्षी फक्त महाराष्ट्रातच 500000 पेक्षा अधिक साप रस्त्यावर मृत्युमुखी पडतात.
3. मानवी वस्ती मध्ये आलेल्या सापांची भीती व अंधश्रध्देच्या पोटी हत्या केली जाते.
4. प्रदूषणामुळे वातावरणात व पाण्यात होणारे बदल.
5. सापांची अंधश्रध्देतून होणारी तस्करी व हत्या.
6. कीटकनाशकांमूळे सुध्दा सापांची संख्या कमी होते.

## ***साप घरात का येतो :-***

1. अस्वच्छता व अडगळी मूळे उंदीर येतात आणि त्यांच्या मागे साप येतात.
2. शिल्लक अन्न (खरकटे) घराजवळ टाकल्यामूळे उंदीर येतात आणि त्यांच्या मागे साप येतात.
3. उंदरांनी केलेली बिळ,जुने वस्तू जसे की - टायर,विटांचा ढीग,लाकडाचे ओंडके, पाईप इ.

## ***<u>साप घरात येऊ नये म्हणून काय करावे :-</u>***

1. परिसर स्वच्छ ठेवणे.
2. घरामध्ये उंदीर येतील असे काही करू नये.
3. शिल्लक राहिलेले अन्न कचरा कुंडीत टाकावे.
4. घराच्या दरवाज्यात किंवा खिडकीतून येणारी फांदी तोडावी ( झाड बिलकुल तोडू नये ).
5. साप लपतील अशी ठिकाणे नष्ट करावीत.

## ***साप घरात आल्यास काय करावे :-***

1. सापाला न मारता सर्पमित्राला बोलवावे.
2. सापावर तीक्ष्ण नजर ठेवावी,जेणे करून सर्पमित्राला साप लवकर सापडेल.
3. घरातील लहान व वृध्द व्यक्तींना सुरक्षित स्थळी पोहोचवावे.
4. ज्या ठिकाणी साप गेला आहे त्या ठिकाणी मुबलक प्रकाशाची व्यवस्था करावी.
5. टॉर्च सर्वांना सापडावी अशा ठिकाणी ठेवावी.
6. जर सर्पमित्र आलेच नाही तर, मोठी काठी किंवा बांबू घ्यावा. त्याला समोर छोटीशी तार बांधून आकडा तयार करावा.व त्या सापास आकड्याने पकडून अलगद परिसरापासून लांब सोडावे.
7. साप छोटा आहे म्हणून त्याला खराट्याच्या काडीने डीवचू नये.असे केल्यास जीवावर बेतू शकते.

## सर्पदंश झाल्यास काय करावे :-

1. सर्पदंश झालेल्या व्यक्तीस मानसिक आधार द्यावा व लवकरात लवकर सरकारी दवाखान्यात घेऊन जावे.
2. सर्पदंश झालेली जखम स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावी.
3. खाली दाखविल्याप्रमाने आवळपट्टी बांधणे.
4. आवळपट्टी बांधताना Crape Bandage कापडाच्या तुकड्यांच्या वापर करावा. दोरी,सुतळी किंवा पतंगीचा मांजा वापरू नये.
5. आवळपट्टी बांधताना चित्रात दाखवल्या प्रमाणे बांधावे. दर 10 मिनिटांनी आवळपट्टी काढून 1 मिनिटांसाठी काढावी व परत बांधावी, असे केल्याने रक्त प्रवाह मंद होईल बंद होणार नाही.
6. आवळपट्टी काही न वापरता फक्त कापडाने जर खच्चून बांधली तर रक्त प्रवाह बंद होऊन सर्पदंश झालेला अवयव निकामी होण्याची शक्यता असते.

# प्रथमोपचार (आवळपट्टी ):-





## ***सर्पदंश कसे टाळावे :-***

1. झाडाझुडपातून व जंगलातून चालताना पायात बुट व डोक्यावर टोपी असावी.
2. रात्रीच्या वेळी बाहेर वावरताना हातात टॉर्च व काठी ठेवावी. काठी जमिनीवर आपटत चालावे.
3. रात्रीच्या वेळेस जमिनीवर झोपणे टाळावे शक्यतो पलंगावर झोपावे.
4. शेतात कापणीच्या वेळी जास्त सतर्क राहावे जमल्यास बूट घालून काम करावे.
5. अडचणीत व अडगळीत हात घालताना आत काही नाही याची खात्री करूनच हात घालावे.

## सर्पदंश अवयव :-

पाय - 72%

खांदा व हात - 25%

डोके व इतर भाग -3%

## सर्पदंश वेळ :-

सकाळ व दुपार - 32%

सायंकाळ व रात्र - 68%

## सापांचे प्रकार :-

1) बिनविषारी साप :-
2) निमविषारी साप :-
3) विषारी साप :-

## बिनविषारी साप :-

1.भारतीय दगडी अजगर :-

2. डुरक्या घोणस :-

3. मांडूळ :-

4.तस्कर :-

5.धामण :-

6.धूळ नागीण :-

7.काळतोंड्या :-

8.कुकरी :-

9.रसेल कुकरी :-

10.रुकासर्प :-


11.कवड्या :-

12.गवत्या :-

13.पानदिवड :-

## भारतीय दगडी अजगर :-





**बिनविषारी साप :-**

**1.भारतीय दगडी अजगर :-**

**Indian Rock Python**

**शास्त्रीय नाव :-** *Python molurus molurus*

**सरासरी लांबी :-** 9 फुट 10 इंच

**अधिकतम लांबी :-** 24 फुट 11 इंच

**रंग व आकर :-** फिकट तपकिरी रंगावर गडद तपकिरी धब्बे असतात. खवले मऊ.डोक्यावर कोनासारखी आकृती.डोळ्यातल्या बाहुल्या उभ्या.शेपटी आखूड.

**प्रजनन काळ :-** जानेवारी ते मार्च दरम्यान मादी 20 ते 80 अंडे घालते, 90 ते 100 दिवसात पिल्ले अंडयातून बाहेर येतात.

**भक्ष्य :-** ससे,हरणाची पिल्ले,डुक्कर,घुशी, कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या इ.

**वास्तव्य :-** हा साप घनदाट जंगलात झाडीत राहणे पसंत करतो.

**वैशिष्ट्य :-** निशाचर.जबड्याच्या पुढील टोकावर असलेल्या उष्णसंवेदनग्राहक खाचामुळे त्यांना भक्ष्य शोधण्यास मदत होते.भक्ष्याला
तोंडाने पकडल्यावर शरीराचा विळखा घालतो व आवळून गुदमरून मारतो,मग भक्ष्याच्या तोंडाकडून सुरुवात करून गिळतो.मध्यम आकाराचा प्राणी पचवायला त्याला अंदाजे 03 आठवडे लागतात.

**प्रजाती :-** अजगराच्या भारतात 04 जाती सापडतात. रॉक पायथॉन,इंडियन रॉक पायथॉन, रेटिकुलेटेड पायथॉन,बर्मी पायथॉन.

## डुरक्या घोणस :-





## 2. डुरक्या घोणस :-

**Sand Boa**

**शास्त्रीय नाव** :- *Gongylophis conicus*

**सरासरी लांबी :-** 1 फूट 8 इंच

**अधिकतम लांबी :-** 3 फूट 3 इंच

**रंग व आकार :-** पांढरट रंगावर काळपट तपकिरी रंगाचे असमान आकाराचे टिपके असतात,खवले खरखरीत असतात, छोट्या डोळयांत उभे बाहुली,नाकपुड्या डोक्यावर.

**प्रजनन काळ:-** जुलै ते ऑगस्ट मध्ये मादी 7 ते 9 पिल्लांना जन्म देते.

**भक्ष्य:-** उंदीर,पाली, सरडे,बेडूक.

**वास्तव्य:-** रेताळ जमीन, माळरानं, जमिनी खाली व दगडाच्या सापटीत राहण्यास आवडते.

**वैशिष्ट्य:-** मुख्यतः निशाचर, शांत व लाजाळू , लहान असताना घोणस किंवा अजगर सारखा दिसतो.

- **मांडूळ :-**







## 3.मांडूळ :-

**Red Sand Boa**

**शास्त्रीय नाव :-** *Eryx johnii*

**सरासरी लांबी :-** 2 फूट 6 इंच

**अधिकतम लांबी :-**3.5 फूट

**रंग व आकार :-**लालसर किंवा काळसर तपकीरी रंग,तोंड व शेपूट आखूड,डोळे लहान.बाहुली उभी, शरीर दंड गोलाकार.

**प्रजनन काळ:-**ऑगस्ट ते सप्टेंबर. मादी ६ ते ७ पिल्लांना जन्म देते.

**भक्ष्य :-**उंदीर,पाल,सरडे.

**वास्तव्य :-**शेतात जास्त, खडकाळ प्रदेश.

**वैशिष्ट्य :-**निशाचर. तोंड व शेपटी दिसायला सारखी, शेत जमीन भुसभुशीत करतो, शत्रूपासून बचावासाठी तोंड शरीराखाली लपवून शेपटी वर काढून तोंड असल्याचा भासवतो.

- तस्कर :-










## *4.तस्कर :-*

**Common Trinket Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Coelognathus helena helena*

**सरासरी लांबी :-**2 फूट 4 इंच

**अधिकतम लांबी :-**5 फूट 6 इंच

**रंग व आकार :-** तपकिरी व शेवाळी अंगांवर फिकट आडवे पट्टे, मानेवर दोन गडद तपकिरी व काळे रेषा, डोक टोकदार,डोळे मोठे व गोल बाहुली, डोळ्यांमागे काळी रेष.

**प्रजनन काळ :-** मार्च ते मे दरम्यान मादी 7ते15 अंडी घालते सुमारे 65 दिवसांनी पिले बाहेर येतात.

**भक्ष्य :-** मुख्यतः उंदीर, पाल, छोटे पक्षी व त्यांचे अंडे.

**वास्तव्य :-**खुरटया झुडपांचा प्रदेश, खडकाळ प्रदेश, खेडी, नागरी वस्ती,तसेच जंगले, विशेषतः भक्ष्यांच्या शोधात जमिनीवरुन झाडावरही चढतो.

**वैशिष्ट्य:-** दिनचर व निशाचर, शरीरावरील नक्षी वाकी या दागिन्यासारखी असते.

- धामण :-





## 5. धामण :-

**Indian Rat Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Ptyas mucosa*

**सरासरी लांबी :-** 6 फूट 7 इंच

**अधिकतम लांबी :-** 11 फूट 6 इंच

**रंग व आकार:-** तपकीरी,शेवाळी,पिवळा किंवा काळा.अंगावर जाळीदार काळी नक्षी,शेपटीवर नक्षी स्पष्ट दिसते, मानेपेक्षा डोके मोठे,ओठांच्या खाली काळया उभ्या रेषा.

**प्रजनन काळ :-** मार्च ते मे दरम्यान मादी 8 ते 20 अंडी घालते.

**भक्ष्य :-** उंदीर,बेडूक, पाली,सरडे, खारी व इतर छोटे साप.

**वास्तव्य:-** उंदरांची बिळे,गवताळ प्रदेश, दलदलीत प्रदेश,वारुळे,मानवी वस्ती जवळ.

**वैशिष्ट्ये:-** दिनचर.अतिशय चपळ पोहतो व झाडावर चढू शकतो..

## ❑ धूळ नागीण :-





## ***6.धूळ नागीण :-***

**Banded Racer**

**शास्त्रीय नाव :-** *Argyrogena fasciolata*

**सरासरी लांबी:-** 2 फूट 6 इंच

**अधिकतम लांबी:-** 4 फूट 5 इंच

**रंग व आकार:-** फिकट किंवा गडद तपकीरी.लांब शरीरावर मऊ खवले. हुबेहुब नागासारखे दिसते.

**प्रजनन काळ:-** फेब्रवारी ते एप्रिल.मादी 5 ते 12 अंडी घालते.

**भक्ष्य :-** उंदीर, सरडे, बेडूक, पाली.

**वास्तव्य:-** गवतात,उंदराच्या बिळात, दगडांच्या सापटित व मानवी वस्ती जवळ.

**वैशिष्ट्ये:-** दिनचर.अतीचपळ, डिवचला गेला असता मानेचा भाग फुगवतो त्यामुळे नागासारखा दिसतो.नागाप्रमाणे दिसतो म्हणून नागीण. धूळ जशी क्षणात नाहीशी होते तसाच हा साप क्षणात नाहीसा होतो इतका चपळ म्हणून धूळ नागीण हे नाव पडले.पिल्लांच्या अंगावर ठराविक अंतरावर पांढरे आडवे पट्टे असतात, नंतर ते नाहीसे होतात.

## ❑ काळतोंड्या :-





## 7.काळतोंड्या :-

**Black- Headed Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Sibynophis subpunctatus*

**सरासरी लांबी :-** 10 इंच

**अधिकतम लांबी :-** 1 फूट 6 इंच

**रंग व आकार :-** लालसर तपकिरी शरीरावर छोट्या काळया ठिपक्यांची रांग,डोके काळे,लांब गोलाकार शरीर,लांब निमुळती शेपटी.

**भक्ष्य :-** लहान पाली,छोटे साप,सापसुरळया.

**वास्तव्य:-** दगड व ओंडक्याखाली आढळतो. पालापाचोळा यात राहणे पसंत करतो..

**वैशिष्ट्ये :-** चपळ,हा साप इतका लहान आहे की, त्याने चावण्याचा प्रयत्न केला तरी तो चावू शकत नाही.

## कुकरी :-





## 8.कुकरी :-

**Banded Kukri**

**शास्त्रीय नाव :-** *Oligodon arnensis*

**सरसरी लांबी :-** 1 फूट 32 इंच

**अधिकतम लांबी :-** 2 फूट 2 इंच

**रंग व आकार :-** राखाडी व लालसर तपकिरी,शरीरावर साधारण 20 काळे किवा गडद तपकिरी रंगाचे आडवे पट्टे आणि डोक्यावर इंग्रजी 'V' ची खूण.

**प्रजनन काळ :-** मार्च ते जून दरम्यान मादी 3 ते 9 अंडी घालते.

**भक्ष्य :-** पाली, उंदीर,सरपटणाऱ्या प्राण्याची अंडी.

**वास्तव्य :-** वारुळात,दगडांच्या सापटित,झाडांच्या ढोलीत.

**वैशिष्ट्ये :-** लाजाळू,सहसा चावत नाही,चपळ.

## रसेल कुकरी :-





## 9.रसेल कुकरी :-

**Russell's Kukari Snake**

**शास्त्रीय नाव** :- *Oligodon taeniolatus*

**सरासरी लांबी :-** 1 फूट

**अधिकतम लांबी :-** 1.5 फूट

**रंग व आकार :-** डोके तसेच मानेवर उलटा( V ) अशी खूण.पांढरे किंवा फिकट पिवळसर पोट,अंगावर 4 पिवळसर रेषा,आखूड शेपटी.

**प्रजनन काळ :-** एप्रिल महिन्यात मादी 5 ते 9 अंडी घालते

**भक्ष्य :-** लहान सरपटणारे प्राणी व त्यांची अंडी.लहान असताना कीटक, कोळी.

**वास्तव्य :-** जंगलामध्ये तसेच नागरी वस्तिच्या जवळपास.

**वैशिष्ट्ये** :- दिनचर तसेच निशाचर. शांत स्वभावाचा पण चिडला असता शरीर
फुगवून हल्ला करतो.

## ❑ रुकासर्प :-





## 10.रुकासर्प :-

**Bronzeback Tree Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Dendrelaphis tristis*

**सरासरी लांबी:-** 3 फूट 3 इंच

**अधिकतम लांबी**:- 5 फूट 7 इंच

**रंग व आकार:-** पाठीवर, डोक्यापासून शेपटी पर्यंत एक तपकीरी रंगाची रेष.मोठ्या सोनेरी डोळ्यात गोल बाहुली,लांब शरीर, चपटे डोके.

**प्रजनन काळ:-** एप्रिलच्या सुमारास मादी 6-8 लांबट अंडी घालते.

**भक्ष्य:-** बेडूक, पाली,सरडे,लहान पक्षी.

**वास्तव्य :-** दमट जंगलात तसेच कोरडया झुडपी प्रदेशात,घाटावर, बांबूच्या बेटात.

**वैशिष्ट्ये:-** दिनचर, अत्यंत वेगवान साप, छेडल्यास मानेकडचा भाग फुगवतो आणि खवल्यामधे लपलेला निळा रंग दाखवतो.

## कवड्या :-





## 11.कवड्या :-

**Common Wolf Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Lycodon aulicus*

**सरासरी लांबी :-** 1 फूट

**अधिकतम लांबी :-** 2 फूट 7 इंच

**रंग व आकार :-** लालसर किंवा काळया शरीरावर मानेजवळ रुंद पांढरा किंवा पिवळा आडवा पट्टा.बाकी शरीरावर पांढरे किंवा पिवळ सर आडवे पट्टे, हे पट्टे शेपटी कडे फिकट होत जातात.चपटे व रुंद डोके.

**प्रजनन काळ :-** मार्च ते मे मध्ये मादी 4 ते 12 अंडी घालते.

**भक्ष्य :-**मुख्यतः पाली, उंदीर,सापसुरळी,बेडूक.

**वास्तव्य :-** दगड मातीच्या ढिगात राहणे पसंत करतो,मानवी वस्तीच्या जवळपास ,जंगले.

**वैशिष्ट्ये :-** निशाचर.पाल हे प्रमुख खाद्य असल्याने हा उभ्या भिंती चढू शकतो.हा साप मण्यार या विषारी सापासारखा दिसतो.चपळ व चिडक्या स्वभावाचा.

## ❑ गवत्या :-







## 12. गवत्या :-

**Green Keelback / Grass Snake**

**शास्त्रीय नाव** :- *Macropisthodon plumbicolor*

**सरासरी लांबी :-** 1 फुट 10 इंच

**अधिकतम लांबी :-** 3 फुट 1 इंच

**रंग व आकार :-** शरीर हिरवे व त्यावर पांढरे काळे ठिपके. जस जसा साप मोठा होत जातो तसे त्याच्या शरीरावरील ठिपके नाहीसे होतात. डोळे मोठे व गोल बाहुली.

**प्रजनन काळ :-** मार्च ते जून दरम्यान मादी 7 ते 16 अंडी घालते.

**वास्तव्य :-** शेत,जंगले, शहर,खेड़े व खड़काळ प्रदेश

**भक्ष्य :-** बेडूक,पाल,सरडे ई.

**वैशिष्टे :-** रात्री चपळ. डिवचले असता मान चपटी करून नाग असल्या सारखे भासवतो.मुळात लाजाळु.

- दिवड :-





## 13. दिवड :-

**Checkered Keelback Water Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Xenochrophis piscator*

**सरासरी लांबी :-** 2 फूट

**अधिकतम लांबी :-** 5 फूट 9 इंच

**रंग व आकार :-** काळया,शेवाळी,पिवळ्या किंवा राखाडी रंगाच्या खवल्यांमध्ये पांढऱ्या किंवा पिवळा खवल्यांची रांग,बुद्धिबळाच्या पटासारखा एक आड एक चौकोनी नक्षी.

**प्रजनन काळ:-** डिसेंबर सुमारास मादी 30 ते 90 अंडी घालते.

**भक्ष्य :-** मासे, बेडूक.

**वास्तव्य :-** नद्या, तळी या लगत उथळ पाण्यात.रात्री जमिनीवर राहणे पसंत करतो.

**वैशिष्ट्ये :-** दीनचर तसेच निशाचर.स्वभाव तापट, डिवचल गेलं असता मानेचा भाग पसरवतो आणि तोंड उघडे ठेवून हल्ला करतो,हाताळला असता शरीरातून घाण वासाचा स्राव सोडतो.


## ❑ *निमविषारी साप :-*

1.उडता सोनसर्प :-

2.मांजऱ्या साप :-

3.हरणटोळ :-

## उडता सोनसर्प :-





## निमविषारी साप :-

## 1.उडता सोनसर्प :-

**Ornate Flying Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Chrysopelea ornata*

**सरासरी लांबी :-**3 फूट 3 इंच

**अधिकतम लांबी :-**5 फूट 9 इंच

**रंग व आकार :-** पिवळा,हिरवट पिवळा, फिकट हिरवा. शरीरावर काळ्या फुल्या व केशरी ठिपके. लांब निमुळते शरीर,मऊ खवले, मोठे डोळे व गोल बाहुली.


**प्रजनन :-**डिसेंबर-जानेवारी हा मिलनाचा कालावधी असतो. जून-जुलै दरम्यान मादी 6-12 अंडी घालते.

**भक्ष्य :-**बेडूक, पाल,सरडे, छोटे पक्षी.

**वास्तव्य :-**प्रामुख्याने झाडावर.

**वैशिष्ट्ये :-** दिनचर.चपळ.पाण्यासाठी पहाटे जमिनीवर येतो. झाडावर 100 मीटर अंतरापर्यंत हवेत तरंगत जाऊ शकतो.

## मांजऱ्या साप :-





## 2.मांजऱ्या साप :-

**Common Cat Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Boiga trigonata*

**सरासरी लांबी :-** 2 फूट 2 इंच

**अधिकतम लांबी :-** 4 फूट 1 इंच

**रंग व आकार :-** शरीरावर गडद किंवा फिकट तपकिरी नागमोडी खुणा.पोट पिवळ किंवा पांढरे व त्यावर छोटे ठिपके. डोक्यावर बाणाकृती खुण.डोळे मांजरासारखे.डोळ्यामध्ये उभी बाहुली.डोळ्यांमागे गडद तपकिरी रेष.

**प्रजनन :-** मादी झाडांच्या ढोलीत साधारण 3-10 अंडी घालते.

**भक्ष्य:-**पाली, बेडूक, उंदीर आणि छोटे पक्षी.

**वास्तव्य :-** जंगले, खेडी,सहसा झाडांवर,गवताळ भागात किंवा झुडपांमध्ये आढळतो.

**वैशिष्ट्ये :-** निशाचर.डिवचला गेला असता हल्ला करण्यापूर्वी डोके वर उचलतो आणि शेपूट जोरात हलवतो.

## हरणटोळ :-





## 3.हरणटोळ :-

**Vine Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Ahaetulla nasuta*

**सरासरी लांबी :-** 3 फूट 3 इंच

**अधिकतम लांबी :-** 6 फूट 7 इंच

**रंग व आकार :-** हिरवा. पोटाकडील बाजू फिकट हिरवी आणि त्यावर दोन्हीकडे पांढरे रेषा.पूर्णतः तपकिरी रंगाचे सापही या प्रजातीत आढळतात. लांब निमुळते डोके.सोनेरी डोळे,डोळ्यांतील बाहुली आडवी,निमुळत्या डोक्यामुळे याला द्विनेत्री दृष्टि मिळते. शरीर व शेपूट लांब, सडपातळ.

**प्रजनन :-** मादी 3-23 पिलांना जन्म देते.

**भक्ष्य :-** पाली, बेडूक, लहान पक्षी, पक्ष्याची पिले आणि अंडी.

**वास्तव्य :-** छोट्या झुडपांवर व तसेच उंच झाडांवर राहतो.

**वैशिष्ट्ये :-** दिनचर परंतु रात्रीही दिसतो. डिवचला गेला असता मान फुगवून इतर वेळी न दिसणारी काळी-पांढरी नक्षी दाखवतो आणि तोंड उघडे ठेवून हल्ला करतो.

# विषारी साप :-

1.मण्यार :-

2.नाग :-

3.घोणस :-

4.फुरसे :-

5.पोवळा :-

6.चापडा :-

7.नागराज :-

- **मण्यार :-**





## ❑ विषारी साप :-

## 1.मण्यार :-

**Common Krait**

**शास्त्रीय नाव :-** *Bungarus caeruleus*

**सरासरी लांबी :-** 3 फूट 3 इंच

**अधिकमत लांबी :-** 5 फूट 9 इंच

**रंग व आकार :-** काळसर निळा किंवा गडद तपकिरी.त्यावर पांढऱ्या पट्टांच्या जोड्या. पट्टया डोक्यावर फिकट तर शेपटीकडे गडद.डोक्यावरील भाग पूर्ण काळा. ओंठ आणि पोटावरील भाग पांढरा. दंडगोलाकार शरीर.शेपूट आखूड.

**प्रजनन :-** मार्च ते मे.मादी 8 ते 12 अंडी घालते.

**भक्ष्य :-** इतर साप( आवडता साप कवड्या ),उंदीर, बेडूक, पाली.

**वास्तव्य :-** दिवसा वारुळे,उंदरांची बिळे, दगड-विटांच्या ढिगाऱ्यात विश्रांती करतो.

**वैशिष्ट्ये :-** निशाचर, लाजाळू, रात्रीच बाहेर पडतो.


- नाग :-











## 2.नाग :-

**Spectacled Cobra**

**शास्त्रीय नाव :-** *Naja naja*

**सरासरी लांबी :-** 3फूट 3 इंच

**अधिकतम लांबी :-** 7 फूट 3 इंच

**रंग व आकार :-** तपकीरी ,पिवळसर,राखाडी किंवा काळा.डोक्याचा भाग मोठा नाकपुड्या मोठ्या.डोळे मोठे व काळे,गोल बुबुळ.फण्यामागे मोडी लिपीतील दहाचा आकडा असतो.

**प्रजनन :-** एप्रिल मे मध्ये मादी 10 ते 15 अंडी घालते.

**भक्ष्य :-** चामकुळी बेडूक,बेडूक,उंदीर व क्वचित प्रसंगी छोटे साप.

**वास्तव्य :-** जंगल,गवताळ भाग,वारुळे, पडकी घरे.

**वैशिष्ट्ये :-** दिनचर व निशाचर आहे. डिवचले गेल्यास फणा काढतो. याला त्याच्या निमुळत्या तोंडामुळे द्विनेत्री दृष्टी असते.

## घोणस :-





# ***3. घोणस :-***

**Russell's Viper**

**शास्त्रीय नाव :-** *Daboia russelii*

**सरासरी लांबी :-** 3 फूट 3 इंच

**अधिकतम लांबी :-** 5 फूट 11 इंच

**रंग व आकार :-** तपकिरी,त्यावर पांढरी किनार असलेल्या गडद तपकिरी गोल ठिपक्यांच्या तीन रांगा, ओंठ व पोटाकडचा भाग पांढरा, स्थूल गोलाकार शरीर आणि आखूड शेपटी.चपटे व त्रिकोणी डोके.मोठ्या नाकपुड्या.डोळ्यांची बाहुली उभी.

**प्रजनन :-** मे जुलै दरम्यान मादी 20 ते 100 पिलांना जन्म देते.

**भक्ष्य :-** उंदीर व लहान सस्तन प्राणी.

**वास्तव्य :-** वारुळात,उंदराच्या बिळात,गवताळ भागात, शेतात तसेच मानवी वस्तीजवळ.

**वैशिष्ट्ये :-** मुख्यत: निशाचर पण दिवसा ही दिसतो, डिवचला गेला असता वेटोळे करून जोराने फुत्कार सोडतो व हल्ला करतो. याचा आवाज कूकरच्या शिट्टी सारखा असतो.याचा हल्ल्याचा वेग 1 सेकंदाला 8 फूट एवढा असतो.

## फुरसे :-





# 4. फुरसे :-

**Saw- Scaled Viper**

**शास्त्रीय नाव :-** *Echis carinatus*

**सरासरी लांबी :-** 1 फूट 4 इंच

**अधिकतम लांबी :-** 2 फूट 7 इंच

**रंग व आकार :-** फिकट तपकिरी शरीरावर पांढरी नक्षी.पोटकडील भाग पांढरा व त्यावर छोटे तपकीरी ठिपके.गोलाकार शरीर.खवल्यांवर करवती सारखे दाते.त्रिकोणी आखूड शेपूट.डोके मानेपेक्षा मोठे, डोक्यावर एक पांढरी किंवा फिकट तपकिरी बाणाकृती खूण. मोठे सोनेरी डोळे. बाहुली उभी.

**प्रजनन :-** एप्रिल ते ऑगस्ट मध्ये मादी 4 ते 10 पिल्लांना जन्म देते.

**भक्ष्य :-** पाली,सरडे, विंचू, गोम,बेडूक, छोटे उंदीर.

**वास्तव्य :-** भात शेती, दगडाखाली व काटेरी झुडपात राहतो.

**वैशिष्ट्ये :-** दिनचर तसेच निशाचर. डिवचला गेला असता शरीराचे वेटोळे करून खवले एकमेकांवर घासतो आणि करवतीसारखा आवाज करतो.

## पोवळा :-






## 5. पोवळा :-

**Slender Coral Snake**

**शास्त्रीय नाव :-** *Calliophis melanurus*

**सरासरी लांबी :-** 1 फूट 2इंच

**अधिकतम लांबी :-** 1 फूट 11 इंच

**रंग व आकार :-** तपकिरी, डोके व मान फिकट.आखूड शेपटीवर दोन काळे आडवे पट्टे,शेपटीखाली निळा आणि काळा रंग .

**प्रजनन :-** वाळलेल्या पानांखाली किंवा दगडांच्या सापटीत मादी 2-7 अंडी घालते.

**भक्ष्य :-**लहान किडे व त्यांची अंडी.

**वास्तव्य :-** मुख्यत: जमिनीत दगडांखाली किंवा वाळलेल्या पानांखाली.

**वैशिष्ट्ये :-** दुर्मिळ असणारा हा साप निशाचर आहे.डिवचले गेले असता शेपटी वर करून खवल्यांचा लाल रंग प्रदर्शित करतो.

## चापडा :-





## 6. चापडा :-

**Bamboo Pit Viper**

**शास्त्रीय नाव :-** *Trimeresurus gramineus*

**सरासरी लांबी :-** 1 फूट 4 इंच

**अधिकतम लांबी :-** 3 फूट 7 इंच

**रंग व आकार :-** शेवाळी पिवळसर हिरवे किंवा निळे शरीर त्यावर फिकट किंवा गडद तपकिरी नक्षी, लहान सापांमध्ये ही नक्षी अधिक गडद असते.त्रिकोणी ,चपटे,रुंद डोके, डोळे नाकपुडयांच्या मध्ये उष्म संवेदनाग्राहक खाचा.

**प्रजनन :-** जुन ते जुलै दरम्यान मादी 4 ते 15 पिल्लांना जन्म देते.

**भक्ष्य :-** उंदीर व छोटे सस्तन प्राणी, छोटे पक्षी आणि पाली.

**वास्तव्य :-** डोंगरातल्या जंगलात आढळतो.

**वैशिष्ट्ये :-** निशाचर,संथ सरपटतो. डिवचला गेला असता शेपूट जोराने हलवतो तसेच तोंड उघडे ठेवून हल्ला करतो.

## नागराज :-





## ***7.नागराज :-***

**King Cobra**

**शास्त्रीय नाव :-** *Ophiophagus hannah*

**सरासरी लांबी :-** 9 फूट 10 इंच

**अधिकतम लांबी :-**15 फूट 7 इंच

**रंग व आकार :-** पिवळसर तपकिरी, राखाडी किंवा गडद शेवाळी शरीरावर रुंद पिवळसर पांढरे आडवे पट्टे. हे पट्टे लहान सापांमध्ये ठळक असतात.पोटकडील बाजू फिकट तपकिरी किंवा राखाडी.शरीर लांब व जाड.फणा नागापेक्षा लांब आणि उभट.शेपूट काळसर.डोळ्यांत गोल बुबूळ.

**प्रजनन :-** हा जगातला एकमेव साप आहे जो अंडी घालण्यापुर्वी घरटे तयार करतो. मादी वाळलेली पाने गोळा करते.एप्रिल-मे दरम्यान मादी 20 ते 50 अंडी घालते.

**भक्ष्य :-** नागराजासह इतर साप.

**वास्तव्य :-** दमट ओल्या जंगलात राहणे पसंत करतो. डोंगर उतारावर, बांबूच्या वनात आढळल्याची नोंद.

**वैशिष्ट्ये :-** दिनचर तसेच निशाचर.लाजाळू.डिवचला गेला असता 90-120 cm(3-4 फूट) उंच फणा उभारतो. विषारी सापांमधील हा सर्वात लांब साप आहे. नागाच्या तुलनेत याचे विष कमी तीव्रतेचे असते, परंतु त्याची मात्र 7 मिलि. इतकी मोठी असते. त्यामुळे तो जास्त धोकादायक ठरतो.

# गैरसमज व स्पष्टीकरण

**1. साप दूध पितो.**

**स्पष्टीकरण :-** कोणताच साप दूध पित नाही. साप मांसाहारी असून तो फक्त जीवंत प्राणीच खातों.दूध हे सस्तन प्राण्याचे अन्न आहे.

**2. साप पुंगीच्या तालावर नाचतो.**

**स्पष्टीकरण :-** सापाला कान नसतात.त्यामुळे सापाला ऐकू येत नाही.साप पुंगीच्या हालचाली वर नाचतो.

**3. एक साप मारल्यास दुसरा साप येऊन बदला घेतो.**

**स्पष्टीकरण :-** साप कधीही बदला घेत नाही.सापाची स्मरणशक्ती कमी असल्याने त्याला काहीही लक्षात राहात नसते.

**4. नागमणी असतो.**

**स्पष्टीकरण :-** कोणत्याही सापाच्या डोक्यात नागमणी नसतो. नागमणी म्हणून जे गारुड़ी दाखवतात ते benzene चे खड़े असतात.

**5. साप धनाचे रक्षण करतो.**

**स्पष्टीकरण :-** कोणताही साप धनाचे रक्षण करत नाही. या निव्वळ दंत कथा आहेत

**6. साप फुंकल्यावर माणूस सुजतो.**

**स्पष्टीकरण :-** हे साफ खोटे आहे.कोणताही साप फुंकल्यावर माणूस सुजत नाही.

**7. साप शिट्टी वाजवल्यावर घरात येतो.**

**स्पष्टीकरण :-** सापाला कान नसतात त्यामुळे शिट्टी वाजवल्यावर घरात येत नाही.

**8. धामन चाडी गाठ मारते व माणसाला मारून टाकते.**

**स्पष्टीकरण :-** धामन आधार मिळण्यासाठी गाठ मारते. पण तिच्या गाठ मारण्याने माणूस मरत नाही.

**9.धामनच्या शेपटीला काटा असतो व ती पुरुषाना तो काटा मारून नपुंसक करते**.

**स्पष्टीकरण :-** धामनच्या शेपटीला काटा नसतो.शेपटी **नि**मूळती व टोकदार असल्याने काटा असल्याचा भास होतो.

**10.साप उल्टा झाल्यावरच विष चढते.**

**स्पष्टीकरण :-** सापांचे दात आतील बाजूस वळलेले असतात.काही वेळा सापाचे दात चावल्यानंतर आडकतात.ते सोडवण्यासाठी साप उल्टा होतो. विषारी साप उल्टा जरी न होता चावला तरी विष चढते.

**11.दरवाज्यावर आस्तिक मुनिची शपथ लिहिल्याने साप घरात येत नाही.**

**स्पष्टीकरण :-** सापाला वाचता येत नसल्याने काहीही लिहिले तरी साप घरात येऊ शकतो.

**12.हरणटोळ साप माणसाचे डोके फोड़तो.**

**स्पष्टीकरण :-** माणसाचे डोके खुप टणक असते त्यामुळे कोणताही साप ते फोड़ू
शकत नाही.

**13.सापाच्या अंगावर केस असतात.**

**स्पष्टीकरण :-** सापाच्या अंगावर केस नसतात.कधी कधी साप कात टाकताना आपल्याला सापाच्या अंगावर केस असल्याचा भास होतो.

**14.मांडुळ सापाला दोन तोंड असतात व तो सहा महिने एका बाजूने व सहा महीने दुसऱ्या बाजूने चालतो.**

**स्पष्टीकरण :-** मांडुळ सापाला एकच तोंड असते.त्याची शेपटी आखूड़ असल्याने आपल्याला दोन्हीकडे तोंड असल्यासारखे वाटते.

**15.तंत्र मंत्राने विष उतरते.**

**स्पष्टीकरण :-** तंत्र मंत्राने कधीही विष उतरत नाही.दवाखान्यात (ASV) प्रतीविष दिल्यानेच विष उतरते.

## लक्षणे :-

### बिनविषारी साप :-

1.साप चावलेल्या जागेवर जळजळ झाली नाही, सूज आली नाही तर साप बिनविषारी होता असं समजायला हरकत नाही.

### विषारी साप :-

1.साप चावलेल्या ठिकाणी जळजळ होणे, सूज येणे, अंग जड होणे, जीभ जड होणे, दातखिळी बसणे साप चावला असेल त्या ठिकाणी फोड येणे, नाडीचे ठोके अनियमित होणे, नाकातोंडातून रक्त येणे. लघवीतून रक्त पडणे, हिरडीतून रक्त येणे, लघवीतून रक्त पडणे ही विषारी साप चावल्याची काही सामान्य लक्षणे आहेत.

# सर्पदंशाचे परिणाम



- ***संकल्पना*** :-

1.राहुल शिंदे

- ***मार्गदर्शन*** :-

1.नितिन सोनवणे सर

- ***छायाचित्रण श्रेय*** :-

1.अश्पाक मुछाले

2.प्रसाद शिंदे

3.विश्वा तोड़कर

4.अजय हिरेमठ

5.राहुल शिंदे

## ***माहिती विश्लेषण*** :-

1.अर्चना श्रीचिप्पा

2.रेशमा मुळे

3.विश्वा तोड़कर

## ***डिझाइन*** :-

1.विश्वा तोड़कर

2.शुभम गरड

## विशेष आभार :-

1.निसार नदाफ

2.अर्चना श्रीचिप्पा

3.रेशमा मुळे

4.विश्वा तोड़कर

5.शुभम गरड

6.संध्याराणी दुर्गम

7.अजय हिरेमठ

8.किशोर खलाटे

अधिक माहिती साठी संपर्क साधा

**सर्प अभ्यासक राहुल शिंदे:-9860093712**

**विश्वा तोडकर:-7057475355**